सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**

**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र : तंशिविकापु/शै.वि-४/२०२४/4525 दिनांक : 12 NOV 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त,
सर्व संस्था, पुणे विभाग.

**विषय : राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत मतदान जनजागृती अभियान राबविणे बाबत.**

संदर्भ – शासनाचे पत्र क्र.रासेयो-२०२३/प्र.क्र.१८६/रासेयो कक्ष दिनांक ०८ नोव्हेंबर,२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात येते की, राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत राज्यातील मतदारांच्या मतदानातील टक्केवारीच्या प्रमाणात वाढ होण्याच्या अनुषंगाने आपल्या विभागातील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजने मार्फत (एनएसएस) मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने मतदान जनजागृती अभियान राबविण्यात यावे.

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहकार्यास्तव राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातंर्गत मतदान जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. विद्यापीठ, महाविद्यालय व महाविद्यालया बाहेरील परिसरात जास्तीत जास्त नाविन्यपूर्ण पध्दतीने जनजागृती, प्रसार-प्रचार करण्यात यावा. चौकाचौकात मतदान जागृतीस्तव पथनाटय, रॅली, फ्लेक्स इत्यादी प्रभावी साधनांचा वापर करण्यात यावा. बॅनर फ्लेक्सवर MY BHARAT PORTAL चा LOGO दर्शनीभागावर प्रिंन्ट करावा. नागरिकांचा मतदान प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग वाढावा यासाठीच्या उपाययोजना राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत करण्यात याव्यात.

नागरिकांमध्ये मतदान विषयक जनजागृती करण्यासाठी स्वीप SVEEP (Systematic Voter's Education and Electoral Participation) कार्यक्रम राबविण्यात येतो. त्या अनुषंगाने सदर स्वीप कार्यक्रमातर्गत राज्यातील सर्व रासेयो संलग्न विद्यापीठ/ महाविद्यालया मधील निवडणूक साक्षरता मंडळाचे सक्षमीकरण करून त्याद्वारे मतदान विषयक उपक्रम राबविण्यात यावेत. मतदान जागृती विषयक सर्व उपक्रमांची MY BHARAT PORTAL वर नोंद घेणे क्रमप्राप्त असेल. जनजागृतीसाठी केलेल्या कृतीचे विविध प्रकारचे फोटो तसेच प्रत्येक कृती MY BHARAT PORTAL वर अपलोड करण्यात यावी. रासेयो संलग्न विद्यापीठाने मतदान जनजागृतीसाठी केलेल्या प्रत्यनांचे संकलन एक ते दोन मिनिटांपर्यतच्या व्हिडीओमध्ये करून सदर व्हिडीओ MY BHARAT PORTAL वर अपलोड करावा. याबाबत आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल रासेयो क्षेत्रिय संचालक, पुणे व संचालनालयास कळविण्यासाठी या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

सोबत- संदर्भिय पत्र.

**( डॉ. द. व्यं. जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-400 001.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.022-22679565

**तात्काळ**

क्रमांक:रासेयो-2023/प्र.क्र.186/रासेयो कक्ष दिनांक: 08 नोव्हेंबर, 202४

**प्रति,**
**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना,**
**सर्व विद्यापीठ/ संचालनालये**

**विषय :- राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत मतदान जनजागृती अभियान राबविणे बाबत.**

उपरोक्त विषयानूसार राज्यात दिनांक 20 नोव्हेंबर, 2024 रोजी होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत राज्यातील मतदारांच्या मतदानातील टक्केवारीच्या प्रमाणात वाढ होण्याच्या अनुषंगाने आपल्या विद्यापीठातर्गंत महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांमार्फत मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याच्या दृष्टीने मतदान जनजागृती अभियान राबविण्याबाबत आपल्यास्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहकार्यास्तव राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातंर्गत मतदान जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. आपल्या विद्यापीठातर्गंत महाविद्यालय व महाविद्यालया बाहेरील परिसरात जास्तीत जास्त नाविन्यपूर्ण पध्दतीने जनजागृती, प्रसार-प्रचार करण्यात यावा. चौकाचौकात मतदान जागृतीस्तव पथनाटय, रॅली, फ्लेक्स इ. प्रभावी साधनांचा वापर करण्यात यावा. बॅनर, फ्लेक्सवर **MY BHARAT PORTAL** चा **LOGO** दर्शनीभागावर प्रिंन्ट करावा. नागरिकांचा मतदान प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग वाढावा यासाठीच्या उपाययोजना राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत करण्यात याव्यात.

नागरिकांमध्ये मतदान विषयक जनजागृती करण्यासाठी स्वीप SVEEP (Systematic Voter's Education and Electoral Participation) कार्यक्रम राबविण्यात येतो. त्यानुषंगाने सदर स्वीप कार्यक्रमातर्गंत राज्यातील सर्व रासेयो संलग्न विद्यापीठ/महाविद्यालया मधील निवडणूक साक्षरता मंडळाचे सक्षमीकरण करुन त्याव्दारे मतदान विषयक उपक्रम राबविण्यात यावेत. मतदान जागृती विषयक सर्व उपक्रमांची MY BHARAT PORTAL वर नोंद घेणे क्रमप्राप्त असेल. जनजागृतीसाठी केलेल्या कृतीचे विविध प्रकारचे फोटो तसेच प्रत्येक कृती MY BHARAT PORTAL वर अपलोड करण्यात यावी. रासेयो संलग्न विद्यापीठाने मतदान जनजागृतीसाठी केलेल्या सर्व प्रत्यनांचे संकलन एक ते दोन मिनिटांपर्यतच्या व्हिडीओमध्ये करुन सदर व्हिडीओ MY BHARAT PORTAL वर अपलोड करावा. याबाबत आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल रासेयो क्षेत्रिय संचालक पुणे व या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

**(डॉ. निलेश पाठक)**
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी
रासेयो कक्ष,मंत्रालय,मुंबई